# थकबाकी वसुलीवर उपाय

खुली अर्थव्यवस्था, उदारीकरण, मंदीची लाट या विविध कारणास्तव कर्ज देणारे व कर्ज घेणारे अडचणीत आल्याचे चित्र सर्वत्र दिसू लागलेले आहे. परंतू सहकार क्षेत्रात वरील कारणांचा आधार घेऊन थकबाकी कोणीही केली तरी ती वसुल करणे, हे महत्वाचे काम लांबविता येणे अशक्य आहे. किंबहुना सहकार क्षेत्रात सभासदांना नाडणे व ठराविक नाडणाऱ्यांकडून सहकारी संस्थांची पिळवणुक व नालस्ती करणे याला पायबंद घालण्यासाठी सरकार व सहकारातील कार्यकर्त्यांनी एकत्र येण्याची गरज आहे.

सरकारने केवळ कागदोपत्री **सहकाराविषयी घोषणा करणे, परंतु त्याची अंमलबजावणी न करणे** यातच सरकारचे सहकाराविषयीचे अपयश दृष्टीक्षेपात येते. आणि सरकारचे हे अपयश म्हणजेच आपल्यासारख्या कार्यकर्त्यांचे सुध्दा अपयश आहे हे तितकेच खरे आहे. केवळ सरकार काही करत नाही म्हणून कार्यकर्त्यांनी काही करायचे नाही, असा विचार हा सहकाराच्या मूळ तत्वाशी विसंगत आहे.

एखादी सहकारी संस्था नोंदणी करण्याचे काम सहकार कायद्यानुसार सरकार करते. परंतू नोंदणीचे प्रमाणपत्र दिल्यानंतर त्या सहकारी संस्थेचे सर्वार्थाने अस्तित्व कायम ठेवणे व ती सहकारी संस्था नफ्यात आणून त्याचा फायदा सभासदांना करून देण्याची संविधानिक जबाबदारी कार्यकर्त्यांची आहे, हे मूळ तत्व सहकारातील कार्यकर्त्यांनी विस्मरूण चालणार नाही. परंतु सरकार याबाबतीत स्वतः दुरूस्त होण्यास तयार नसल्याचे चित्र दिवसेंदिवस वाढीस लागले आहे. सरकार काही सहकारी संस्थांना आर्थिक मदत, व्याजात सवलत, कर्ज भरण्याच्या कालावधीत वाढ इत्यादी माध्यमातुन मदत करते व हे तत्व सरकार इतर उर्वरीत सहकारी संस्थांना बिलकूल करत नाही, याच कारणास्तव सहकाराच्या अपयशाविषयी सरकारलाच जबाबदार धरले जात आहे. आणि याला कारणीभूत देखील सरकारच आहे.

सहकारी साखर कारखाने, सुत गिरण्या व इतर काही अत्यल्प सहकारी संस्था सोडल्या तर सरकार महाराष्ट्र राज्यात २,०५,००० सहकारी संस्थांपैकी केवळ ५०० सहकारी संस्थांना वरीलप्रमाणे आर्थीक सवलती देते. ज्यामध्ये साखर कारखाने, सुत गिरण्यांचा समावेश होतो. परंतु उर्वरीत २,०४,५०० सहकारी संस्थांना हे मायबाप सरकार कुठल्याही प्रकारचे पॅकेज, आर्थिक मदत, कमी व्याज दरात कर्ज पुरवठा, सबसिडी किंवा अन्य सवलत / मदत करीत नाही. आणि याचेच दुष्परिणाम संपूर्ण राज्याच्या अर्थव्यवस्थेवर अलिकडच्या काळात मोठ्या प्रमाणात झालेले दिसते. उदाहरण द्यावयाचेच झाले तर राज्यातील १६९ सहकारी साखर कारखान्यांपैकी हाताच्या बोटावर मोजण्याएवढे कारखाने सोडले तर सर्व सहकारी **साखर कारखाने हे स्थापनेपासुन ५ वर्षानंतरही तोट्यात, १० वर्षानंतरही तोट्यात, १५ वर्षानंतरही तोट्यात, २० वर्षानंतरही तोट्यात आहेत. सभासद शेतकऱ्यांच्या वर्षानुवर्षे मुळ ठेवींच्या रकमा / व त्यावरील व्याज हे कारखाने देत नाहीत.** आणि अशा संचालक मंडळांना सरकार मात्र इतर सहकारी संस्थांप्रमाणे जेलमध्ये टाकण्यास तयार नाही, ही **बाब सरकारसाठी, केवळ शरमनाक नाही तर संविधानाची क्रुर चेष्ठा मोकाटपणे करताना दिसत आहे.** आणि त्याचाच दुष्परिणाम संपूर्ण सहकार क्षेत्रात, कार्यकर्त्यांमध्ये द्वेषाची व चिडीची भावना दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे.

आणि अशाही परिस्थितीत पतसंस्था टिकण्याची व टिकविण्याची जबाबदारी सरकार नाकारीत आहे. सरकारचा नकारात्मक दृष्टिकोन कुठल्याही क्षणी सरकारलाच अडचणीत आणू शकतो. व त्याचे दुरगामी परिणाम

राज्याच्या आर्थिक स्थैर्यावर होवू शकतो, आणि त्याच्या मुल्यमापनाची वेळ अत्यंत जवळ आल्याचे समोर दिसत आहे.

पतसंस्थांमधील झालेली थकबाकी व थकबाकी वसुल करणेसाठी लागणारी आवश्यक यंत्रणा जर सुक्ष्मपणे तपासून पाहिली तर, थकबाकी वसुलीची समस्या सरकार सोडवू शकत नाही. परंतू सरकारने पतसंस्थांमध्ये झालेल्या थकबाकी संदर्भातील **एन. पी. ए.** स्वतः खरेदी करुन त्या रकमा पतसंस्थांच्या खात्यात वर्ग करण्याचे दायीत्व स्विकारावे लागेल. त्यासाठी काळाची प्रतिक्षा करावी लागेल. परंतू पतसंस्थांनी वाटलेल्या कर्जाची थकबाकी व अशा थकबाकीच्या रकमा **पतसंस्थांनीच वसुल करावयाच्या आहेत** हे ही तेवढेच महत्वाचे आहे, त्यासाठी सहकारातील कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन यावर एक रामबाण उपाय शोधलेला आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

‘‘ महाराष्ट्र राज्यात १८ हजाराच्यावर नागरी सहकारी पतसंस्था आहेत. व थकबाकीचे प्रमाण हे सर्वसाधारणपणे १० ते १५ टक्के आहे. एकट्या मुंबई शहरात अशा थकबाकीदारांच्या विरोधात पतसंस्थांनी गेल्या २ वर्षात सर्वसाधारणपणे ५० हजाराच्यावर **कलम १०१ व ९१ खाली कर्ज वसुली दाखले** मिळविलेले आहेत. म्हणजेच या ५० हजार अॅवार्ड मिळालेल्या थकबाकीदारांचे १ लाख जामीनदारसुध्दा या थकबाकीदारांच्या यादीमध्ये कोर्टाच्या निकालाप्रमाणे समाविष्ट आहेत. म्हणजेच ५० हजार थकबाकिदार व त्यांचे १ लाख जामिनदार या सर्वांची **संपूर्ण नाव**, **राहण्याचा संपूर्ण पत्ता**, **गावचा संपूर्ण पत्ता**, **नोकरी / व्यवसायाचा संपूर्ण पत्ता**, **कर्ज घेतल्याची तारीख**, **कर्ज घेतलेली रक्कम रूपये**, **कलम १०१ / ९१ खाली अॅवार्ड झालेली तारीख** व **अॅवार्डप्रमाणे एकूण वसुल करावयाची रक्कम**,**कर्जाचा प्रकार** तसेच कर्जासाठी **जे तारण दिले** त्याचा तपशिल इत्यादीसह माहिती प्रसिध्द करण्याची जबाबदारी व दायित्व **बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, मुंबई** ने स्विकारलेली आहे. यासाठी १९ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईतील श्री षन्मुखानंद सभागृहामध्ये अशी माहिती प्रसिध्द करणाऱ्या **वेबसाईट चे उद्‌घाटन** झाले. **www. mahasahakar. com** नावाची ही वेबसाईट संपूर्ण जगासमोर अस्तित्वात आणली आहे. ’’

तरी सर्व पतसंस्थांनी या वेबसाईटचे सभासद होऊन आपआपल्या पतसंस्थेतील कलम १०१ / ९१ खाली प्राप्त झालेल्या अॅवार्डच्या प्रतिसह वरील उल्लेखलेली सर्व माहिती या वेबसाईटवर स्वतःच्या पतसंस्थेत बसून Upload / input करावयाची आहे. या संदर्भात सर्व माहिती याप्रमाणे वेबसाईटवर प्रसिध्द होवुन वरील ज्या थकबाकीदारांनी पतसंस्थेला ठगविले आहे, त्यांना दुसरी कुठलीच पतसंस्था किंवा बँक कर्ज देऊ शकणार नाही. शिवाय वेबसाईटवरून थकबाकीदाराचे / जामिनदाराचे आपले नाव कमी करावयाचे असेल तर त्यांनी त्या पतसंस्थेची संपूर्ण थकीत रक्कम प्रथम भरणे आवश्यक आहे. **या वेबसाईटमुळे संपूर्ण राज्यात थकबाकीदारांना थकबाकी भरल्याशिवाय आता पर्याय उरलेला नाही,** आणि त्याची सुरवात मुंबईतून होत आहे. **यासाठी पतसंस्था व सरकार व सहकारातील कार्यकर्त्यांनी या वेबसाईटबद्दल स्वत:हुन पुढे येणे आवश्यक आहे.** मुंबईतील कार्यकर्त्यांनी **‘‘ बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, मुंबई ’’** च्या माध्यमातून वरीलप्रमाणे पुढाकार घेतलेला आहे. व याचा फायदा संपूर्ण राज्यभर होवून भारतीय रिझर्व्ह बँक / केंद्र सरकार व राज्य सरकार यांचे माध्यमातून देशातील सर्व बँका व पतसंस्थांना ही योजना लागू करण्यासाठी युध्द पातळीवर काम आम्ही चालू केलेले आहे. पतसंस्थांसाठी ह्या निमित्ताने ‘‘थकबाकी वसुलीसाठी रामबाण उपाय’’ उपलब्ध करून दिला आहे. आणि हिच माहिती या अग्रलेखात या निमित्ताने वरीलप्रमाणे दिली आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!